INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांचा भावनिक समायोजन व जीवन कौशल्यांच्या तुलनात्मक अभ्यास

## (A Comparative Study of Emotional Adjustment and Life Skills Among Students in Ashram Schools)

**डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक**

सहायक प्राध्यापक,
आर सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2025-79745961/IRJHIS2505046

***सारांश :***

*प्रस्तुत संशोधनात आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांचा भावनिक समायोजन व जीवन कौशल्यांच्या तुलनात्मक अभ्यास सर्वेक्षण संशोधन पद्धतीने केला आहे. शिरपूर तालुक्यातील 04 आश्रम शाळा निवडून प्रत्येकी 25 विद्यार्थी – एकूण 100 विद्यार्थी. त्यात मुलं व मुली समाविष्ट करण्यात आल्या आहेत. माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे स्वनिर्मित भावनिक समायोजन चाचणी – विधाने 20, पर्याय – सहमत, असहमत, सांगता येत नाही. स्वनिर्मित जीवन कौशल्य चाचणी- विधाने 25, पर्याय – सहमत, असहमत, सांगता येत नाही. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी mean, SD, t-test या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे. विध्यार्थिनीपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये अधिक जीवन कौशल्ये आणि अधिक भावनिक समायोजन दिसून येते.*

**प्रस्तावना :**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून, अनेक सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर समाज घटनांचे विविध घटक अस्तित्वात आहेत. या संदर्भात अनुसूचित जमाती (Adivasi) समाज हा शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याचे चित्र आहे. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी सरकारतर्फे 'आश्रम शाळा' ही संकल्पना राबविण्यात आली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत राहण्याची, भोजन व आरोग्याची सोय केली जाते. शिरपूर तालुका हा धुळे जिल्ह्यातील आदिवासी बहुल भाग आहे. येथे अनेक आश्रम शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर केवळ शैक्षणिक ज्ञानाचेच नव्हे, तर जीवन कौशल्य (Life Skills) व भावनिक समायोजन (Emotional Adjustment) यांचाही मोठा परिणाम होतो. हे घटक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात अत्यंत महत्त्वाचे ठरतात.भावनिक समायोजन म्हणजे विविध परिस्थितीत स्वतःला भावनिकदृष्ट्या सुसंगत ठेवण्याची क्षमता होय. तर जीवन कौशल्य म्हणजे निर्णय घेणे,

समस्या सोडवणे, संवाद कौशल्य, तणाव व्यवस्थापन इ. क्षमतांचा समावेश होतो. या दोन्ही बाबी विद्यार्थ्यांच्या भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहेत.शिरपूर तालुक्यातील आश्रम शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भावनिक समायोजन व जीवन कौशल्यांच्या स्तरामध्ये कोणते घटक प्रभाव टाकतात? आणि हे घटक एकमेकांशी कसे संलग्न आहेत? याचा तुलनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे. यामधून काही बाबी समजण्यास मदत होईल: विद्यार्थी मानसिकदृष्ट्या कितपत सशक्त आहेत? शाळेतील वातावरण त्यांना भावनिकदृष्ट्या कितपत सक्षम करत आहे? जीवन कौशल्ये शाळेत प्रभावीपणे शिकवली जात आहेत का? मुलं व मुलींमध्ये कोणते अंतर आहे? अशा अभ्यासातून शैक्षणिक धोरणकर्त्यांना तसेच शाळा प्रशासनाला योग्य उपाययोजना करण्यासाठी दिशा मिळू शकेल.

**समस्या विधान :**

शिरपूर तालुक्यातील आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांचा भावनिक समायोजन व जीवन कौशल्यांच्या तुलनात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्टे :**

आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांचा भावनिक समायोजन व जीवन कौशल्यांच्या तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना :**

१. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या भावनिक समायोजनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.

२. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या जीवन कौशल्यांच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.

**संशोधनाची कार्य पद्धती-:**

- **संशोधन पद्धती-** सर्वेक्षण पद्धती
- **न्यादर्श :** शिरपूर तालुक्यातील 4 आश्रम शाळा निवडून प्रत्येकी 25 विद्यार्थी – एकूण 100 विद्यार्थी. त्यात मुलं व मुली समाविष्ट करण्यात आल्या आहेत.
- **साधने (Tools):** माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे


1. स्वनिर्मित भावनिक समायोजन चाचणी – विधाने 20, पर्याय – सहमत, असहमत, सांगता येत नाही.
2. स्वनिर्मित जीवन कौशल्य चाचणी - विधाने 25, पर्याय – सहमत, असहमत, सांगता येत नाही.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे-** संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी mean, SD, t-test या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती संकलन व विश्लेषण:**

1. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या भावनिक समायोजनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.

| गट | N | (M) | (SD) | Table 't' | Obtained 't' |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 50 | 29.63 | 6.13 | 2.00 | 3.43 |
| विद्यार्थ्यांनी | 50 | 25.69 | 5.32 | | |





**निरीक्षण व अर्थ निर्वचन:**

स्वाधीनता मात्रा (df) 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणीनुसार नमुना 't' मूल्य 2.00 आहे व प्राप्त 't' मूल्य 3.43 असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या भावनिक समायोजनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. विद्यार्थ्यांचे भावनिक समायोजनेचे मध्यमान विद्यार्थ्यांनीपेक्षा अधिक आहे.यावरून असे म्हणता येईल की, विद्यार्थी विद्यार्थिनीपेक्षा अधिक भावनिक समायोजनशील आहेत.

2. **आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या जीवन कौशल्यांच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.**

| गट | N | (M) | (SD) | Table ‘t’ | Obtained ‘t’ |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | 50 | 33.96 | 6.78 | 2.00 | 2.70 |
| विद्यार्थ्यांनी | 50 | 30.99 | 7.56 | | |



**निरीक्षण व अर्थ निर्वचन :**

स्वाधीनता मात्रा (df) 98 साठी 0.05 सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणीनुसार नमुना 't' मूल्य 2.00 आहे व प्राप्त 't' मूल्य 2.70 असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या जीवन कौशल्यांच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्याचे मध्यमान विद्यार्थ्यांनीपेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, विद्यार्थीमध्ये विद्यार्थिनीपेक्षा अधिक जीवन कौशल्य दिसून येतात.

**निष्कर्ष :**

1. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या जीवन कौशल्यांच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्याचे मध्यमान विद्यार्थ्यांनीपेक्षा अधिक आहे.यावरून असे म्हणता येईल की, विद्यार्थीमध्ये विद्यार्थिनीपेक्षा अधिक जीवन कौशल्य दिसून येतात.
2. आश्रम शाळांमधील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीच्या भावनिक समायोजनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. विद्यार्थ्यांचे भावनिक समायोजनेचे मध्यमान विद्यार्थ्यांनीपेक्षा अधिक आहे.यावरून असे म्हणता येईल की, विद्यार्थी विद्यार्थिनीपेक्षा अधिक भावनिक समायोजनशील आहेत.

**निष्कर्षावर आधारीत चर्चा :**

विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्ये आणि भावनिक समायोजन जास्त असण्याचे कारण त्यांच्या अनुभव, शालेय वातावरण, आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाशी संबंधित असू शकते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च जीवन कौशल्ये आणि भावनिक समायोजन दिसून येतात. विद्यार्थ्यांचे अधिक जीवन कौशल्य आणि भावनिक समायोजन असणे हे एक समृद्ध आणि सशक्त व्यक्तिमत्त्व दर्शवते. यामुळे शालेय जीवनाच्या आणि इतर सामाजिक जीवनाच्या विविध आव्हानांचा सामना करतांना विद्यार्थ्यांमध्ये अधिक स्थिरता दिसून येते. विद्यार्थ्यांनीचे जीवन कौशल्ये आणि भावनिक समायोजन कमी असणे हे एक चेतावणी आहे. शालेय व्यवस्थापन आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगले मार्गदर्शन, भावनिक समायोजन आणि जीवन कौशल्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. Moradalipour, A., Hossini, S. M., &Kakavandi, K. (2024).The Effectiveness of Life Skills Training on Cognitive Emotion Regulation Strategies, Psychological Well-being and Social Adjustment among Female Junior High School Students. *Journal of research in instructional methods*, *2*(2), 123-140.
2. Yarmohammadian, A., Bonakdar Hashemi, N., & Asgari, K. (2011).The effect of emotional intelligence and life skills training on marital adjustment among young couples. *Knowledge Res Appl Psychol*, *12*(2), 3-12.
3. Kashanizadeh, M., Golparvar, M., & Sajadian, I. (2023). Comparison of the Effectiveness of Affective Capital Traning and Life Skills Training on Emotional Adjustment Among 4-6-Year-Old Children. *Journal of Pediatric Nursing*, *9*(4), 85-96.